## मेट्रो ३ दुसऱ्या टप्प्यातील 'विधानभवन' स्थानक तयार

# भूगर्भातून काढली दीड लाख घनमीटर माती

म. टा. खास प्रतिनिधी

**'कुलाबा-वांद्रे-सीप्झ'**

मेट्रो ३ मार्गिकेला 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ' संबोधले जाते. या मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी उत्तर (प्राप्तीकर कार्यालय) असा असून तो डिसेंबर २०२३पर्यंत सुरू केला जाणार आहे. तर दुसरा टप्पा बीकेसी दक्षिण ते कफ परेड हा डिसेंबर २०२४पर्यंत सुरू केला जाणार आहे. विधानभवन हे स्थानक दुसऱ्या टप्प्यातील आहे.

**मुंबई :** कार्यालयीन कर्मचारी व वाहनांची वर्दळ असलेल्या विधानभवन भूमिगत स्थानकाच्या भूगर्भातून तब्बल १.४० लाख घनमीटर इतकी माती काढण्यात आली आहे. याद्वारे १.८० लाख चौरस फूट क्षेत्रफळाचे स्थानक जवळपास बांधून पूर्ण झाले आहे. मेट्रो ३ या राज्यातील पहिल्या भूमिगत मेट्रो प्रकल्पातील हे स्थानक आहे.

मेट्रो ३ ही मार्गिका मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडते. उत्तरेकडे सारिपूतनगर (आरे कारशेड) ते दक्षिणेकडे कफ परेड, अशी ही मार्गिका आहे. सारिपूतनगरला ही मार्गिका जमिनीखालून वर येते. तशीच कफ परेड स्थानकही जमिनीवर बांधण्यात येत आहे. अशी एकूण २७ स्थानके यांत बांधली जात असून बहुतांश स्थानकांची कामे पूर्ण झाली आहेत.यासंबंधी मुंबई मेट्रो ३ प्रशासनाने विधानभवन स्थानकानची छायाचित्रे ट्विटद्वारे प्रसिद्ध केली आहेत. त्यामध्ये स्थानकाच्या डोक्यावरील जमिनीवरील रस्ते हळूहळू पूर्ववत होत असल्याचे दिसून येत आहे. त्याखेरीज भूमिगत स्थानकात प्रवेश करण्यासाठीचा सरकता जीना बांधून तयार झाला आहे. भूमिगत स्थानकासाठीची वातानुकूलित यंत्रणा सज्ज झाली आहे. हे स्थानक बांधण्यासाठी २०१८मध्ये पहिला खड्डा खणण्यात आला. त्यानंतर हे स्थानक बांधण्यासाठी पाच वर्षे लागली.





